# एईएमएलच्या उपनगरातील ग्राहकांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म्स

प्रतिनिधी • मुंबई

कोविड-१९ साथीने जगाला अधिक घट्ट जोडले आहे आणि ग्राहकांच्या सर्व वर्गांमध्ये डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा वापर खूपच वाढला आहे. अधिकाधिक ग्राहक तंत्रज्ञानाशी जुळवून घेऊ लागले असताना, युटिलिटीजसाठी संधीही अनंत आहेत. शंकांचे निरसन व्हर्च्युअल पद्धतीने करून घेण्यातील सोय आणि यूजर फ्रेण्डली इंटरफेसेसची जोड मिळालेले वन-क्लिक पेमेंट्स यामुळे प्रत्यक्ष भेट देणे किंवा पैसे भरण्याच्या अन्य मार्गांना अत्यंत आकर्षक पर्याय उपलब्ध झाला आहे.

एईएमएल ग्राहक आता सेल्फ मीटर रीडिंग, ईमेल व एसएमएसद्वारे बिले प्राप्त करणे, एईएमएलच्या वेबसाइटवर किंवा ॲपवर बिले बघणे यांसारख्या अनेकविध सेवा डिजिटल पर्यायांचा वापर करून उपलब्ध करून घेऊ लागले आहेत. ग्राहक त्यांची बिले ऑनलाइन मार्गांनी चुकती करू शकतात, नवीन जोडणीसाठी अर्ज करू शकतात, बिलावरील नावे बदलून घेण्यासारख्या प्रक्रिया ऑनलाइन करू शकतात तसेच अशा अनेक सेवांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा वापर करू शकतात, असे कंपनीचे म्हणणे आहे. एईएमएलचे प्रवक्ते डिजिटल सेवांबद्दल म्हणाले, अदाणी इलेक्ट्रिसिटीचा 'सेवेच्या शक्तीवर' ठाम विश्वास आहे. कंपनीचे सर्व काम याच तत्त्वावर चालते. आमच्या कार्यपालन व सेवांमध्ये नवोन्मेषकारी दृष्टिकोन आणण्यासाठी आम्ही बांधील आहोत.